निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक ३०० * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शुक्रवार दि.०६ मार्च २०२६ | * पाने-४


## आदिवासी माजी सरपंचाला भूमाफियांची धमकी; ॲट्रॉसिटी अंतर्गत किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** कोठारी (चि.) येथील आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनीवर डल्ला मारण्यासाठी भूमाफियांनी दहशत माजवल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गावचे ज्येष्ठ नागरिक तथा माजी सरपंच तुळशीराम देवजी गेडाम (वय ६५) यांना रस्त्यात अडवून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की करण्यात आली तसेच जीवंत मारण्याची धमकी देत दहशत निर्माण केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, कोठारी (चि.) येथील शेत सर्वे क्रमांक १८३ ही जमीन आदिवासी महिला शेतकरी लक्ष्मीबाई यांच्या नावावर असून त्यांच्या वारसांच्या जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न काही भूमाफियांकडून सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या जमिनीच्या प्रकरणात वारसांना न्याय मिळावा म्हणून माजी सरपंच तुळशीराम गेडाम हे वेळोवेळी न्यायालयीन प्रक्रियेत मदत करत होते. याच कारणावरून काही जणांनी त्यांच्यावर दबाव टाकत धमक्या दिल्याचे सांगितले जात आहे.

तक्रारीनुसार, आरोपींनी गेडाम यांना रस्त्यात गाठून ''तू आमच्याविरुद्ध कोर्टात जाऊन मदत का करतोस, खूप मोठा झाला का?'' असे म्हणत कॉलर धरून धक्काबुक्की केली. तसेच ''आदिवासी गोंडाडे माजले आहेत, त्यांना आपला हात दाखवावा लागेल'' असे म्हणत धमकावले. इतकेच नव्हे तर ''रात्री सापडलास तर पुलाखाली टाकून जिवंत जाळू'' असा गंभीर इशाराही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या घटनेमुळे भयभीत झालेल्या तुळशीराम गेडाम यांनी किनवट पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या फिर्यादीवरून मनोहर केशव ताटे, संजय केशव ताटे, अंकुश केशव ताटे (सर्व रा. कोठारी), हौसाजी देवजी काकडे, मनु देवजी काकडे (रा. कोठारी) तसेच किनवट येथील शैलेश अंबादास गटलेवार व रमेश रामलु नेम्मानिवार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी किनवट पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४०/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता () कलम १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५१(३) तसेच अनुसूचित जाती–जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील कलम ३(१)(आर), ३(१)(एस), ३(२)(व्ही) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

हा गुन्हा ४ मार्च २०२६ रोजी पोलिस उपनिरीक्षक फडेवार यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे व पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल केला असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी मळघणे करत आहेत.

दरम्यान, या घटनेमुळे कोठारी परिसरातील आदिवासी शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून संबंधित भूमाफियांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

## माहूर तालुक्यातील पाचही वाळू घाटांचा अखेर लिलाव

### ५८०८ ब्रास उत्खननास मान्यता, मात्र लाखो ब्रास वाळू लुटीची चर्चा

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर –** माहूर तालुक्याला वळसा घालून वाहणाऱ्या पैनगंगा नदीवरील पाचही वाळू घाटांचा अखेर ई–लिलाव पूर्ण झाला असून टाकळी, सायफळ, नेर, दिगडी (कु.) व लांजी या घाटांवरून एकूण ५८०८ ब्रास वाळू उत्खननास मान्यता देण्यात आली आहे. मात्र अधिकृत मंजुरीपेक्षा प्रत्यक्षात लाखो ब्रास वाळू उपसा होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून यामुळे तालुक्यात पुन्हा एकदा वाळू तस्करांना सुगीचे दिवस येणार असल्याची चर्चा रंगली आहे.

महसूल व वन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड यांच्या दि. ४ मार्च २०२६ च्या आदेशानुसार नांदेड जिल्ह्यातील वर्ष २०२५–२६ साठी किनवट उपविभागातील पर्यावरण मंजुरी प्राप्त माहूर तालुक्यातील पाच वाळू घाटांचा ई–लिलाव करण्याबाबत जाहीर प्रगटन प्रसिद्ध करण्यात आले होते. त्यानुसार टाकळी, सायफळ, नेर, दिगडी (कु.) आणि लांजी या पाच घाटांसाठी शुभम शंकर गायकवाड (रा. वृंदावन सोसायटी, यशवंतनगर, पुणे) यांनी ४० लाख ९ हजार ९९१ रुपये इतकी उच्चतम बोली लावली. ही बोली सर्वाधिक ठरल्याने संबंधित ठेकेदाराला वाळू उत्खनन, वाहतूक व विक्रीची मंजुरी देण्यात आली आहे.

दरम्यान, याच वाळू घाटांचा यापूर्वी झालेल्या लिलावात सुमारे साडेतीन कोटी रुपये इतकी मोठी बोली लागली होती. मात्र त्या ठेकेदाराने निर्धारित रक्कम जमा न केल्याने तो लिलाव रद्द करण्यात आला होता. त्यामुळे यावेळी झालेल्या लिलावातील रक्कम आणि पूर्वीच्या लिलावातील रक्कम यात मोठी तफावत दिसून येत आहे. साडेतीन कोटींच्या तुलनेत आठपट कमी किमतीत लिलाव मंजूर झाल्याने महसूल प्रशासन व वाळू व्यावसायिकांमध्ये साटेलोटे झाले का, अशी शंका जाणकारांकडून व्यक्त केली जात आहे.

संबंधित लिलावानुसार ठेकेदाराला ५८०८ ब्रास वाळू उत्खननाची मंजुरी मिळाली असून त्यानुसार वाळूचा दर सुमारे ६९० रुपये प्रति ब्रास इतका पडत असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र प्रत्यक्षात ग्राहकांच्या दारापर्यंत हीच वाळू कोणत्या भावात पोहोचणार, हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

माहूर तालुक्यातील पाचही घाटांवरून प्रत्यक्षात किती वाळू उपसा होतो आणि अधिकृत मंजुरीपेक्षा किती जास्त वाळू काढली जाते, याबाबतही विविध चर्चा रंगू लागल्या आहेत. कवडीमोल दरात मिळालेली वाळू नंतर ग्राहकांना सोन्याच्या भावात विकली जाणार, अशी शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे तालुक्यातील वाळू वाहतूकदार आणि तस्करांना सुगीचे दिवस येणार असल्याची उपहासात्मक चर्चा सध्या माहूर परिसरात रंगत आहे.



## हिवरखेडा येथे जल जिवन मिशन अंतर्गत पाण्यासारखा पैसा खर्चूनही ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील हिवरखेडा येथे हर घर जल योजना जलजीवन मिशन अंतर्गत काम झाले आहे प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला दरडोई ५५ लिटर पाणी नियमितपणे उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने योजना सुरू केली आहे. मात्र अद्यापही येथील हिवरखेडा जलजीवनचे काम पूर्ण होऊन देखील ग्रामस्थांना पाणी मिळत नाही . त्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. हिवरखेडा येथील जलजीवनचे काम गत दोन वर्षापासून चालू होते आणि ते काम पूर्ण देखील झाले आहे मग ग्रामस्थांना पाणी का मिळत नाही गावात पाणी नसल्यामुळे. ग्रामस्थांना पायपीट करत शेतातील विहिरीवरून पाणी आणावे लागत आहे. हिवरखेडा ग्रामपंचायतच्या जलजीवन अंतर्गत खोदलेल्या विहिरीला भरपूर पाणीसाठा उपलब्ध आहे. नळजोडणीदेखील टाकण्यात आली आहे. तसेच पाण्याची टाकी देखील उभरण्यात आली आहे





मात्र काही ठिकाणी पाईपलाईन फुटली आहे त्या पाईप लाईन ची दुरुस्ती करून घावी तसेच गावातील अनेक ठिकाणचे नळ देखील मोडले आहेत ते देखील दुरुस्त करावे व तशीच पाईपलाईन साठी खोदलेले रस्ते तात्काळ दुरुस्त करावे प्रशासनाच्या वतीने लाखो रुपये खर्च करून जलजीवन मिशन योजना सुरू करण्यात आली मात्र संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराने काम व्यवस्थितपणे न केल्यामुळे ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे प्रशासनाने तात्काळ याची गंभीर दखल घेऊन तात्काळ पाणी पुरवठा सुरळीत करावा अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात येत आहे.

हिवरखेडा येथे सुमारे एक कोटी रुपये खर्च करून जलजीवन योजना चालू करण्यात आली आहे मात्र संबंधित योजनेचे काम हे निकृष्ट दर्जाचे झाल्यामुळे गावात पाणीपुरवठा सुरळीतपणे पणे चालू नाही मौजे हिवरखेडा येथील जलजीवन अंतर्गत खोदलेल्या विहिरीला पाणी असून देखील गावांमध्ये सध्या तीव्र पाणी टंचाईला ग्रामस्थांना समोर जावे लागत आहे संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराच्यावतीने जी जलजीवन योजनेची पाईपलाईन करण्यात आली त्यामध्ये वापरलेले पाईप हे निकृष्ट दर्जाचे आहेत व तसेच गावामध्ये जे नळ दिले आहेत अर्ध्या गावातील नवे मोडून गेलेले आहेत तसेच पाईपलाईन साठी गावात नाल्या खोदल्या होत्या त्यावर दुरुस्ती देखील संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराने केली नाही मौजे हिवरखेडा येथील जलजीवन च्या सर्व कामाची चौकशी करून तात्काळ गावांमध्ये पाणीपुरवठा चालू करावा अन्यथा दिनांक १७ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे मौजे हिवरखेडा गावातील ग्रामस्थ व महिलांच्या वतीने आपल्या पंचायत समितीवर हंडा मोर्चा घेऊन येऊ याची साहेबांनी नोंद घ्यावी असे या निवेदनात नमूद असून यावर गजानन रुस्तुम हराळ रा. हिवरखेडा यांची स्वाक्षरी आहे.

## हिंगोलीत लाचखोर मुख्याध्यापक एसीबीच्या जाळ्यात,घरभाडे भत्यातून शिक्षकाकडून कमिशन, २८ हजार स्वीकारताना रंगेहात अटक

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** औंढा तालुक्यातील लाख येथील मधोमती विद्यालयाच्या मुख्याध्यापकास शिक्षकाकडून २८ हजार रुपयांची लाच घेतांना हिंगोलीच्या लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने गुरुवारी ता. ५ दुपारी हिंगोलीत रंगेहात पकडले. याप्रकरणी हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, औंढा नागनाथ तालुक्यातील लाख येथील मधोमती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील एका शिक्षकाला संपूर्ण वर्षाचा घरभाडे भत्त्या पोटी ५८ हजार रुपयांची रक्कम मिळाली होती. मात्र सदर रकमेतून ५० टक्के रक्कम दे असा मुख्याध्यापक संतोष कढणे याने शिक्षकाकडे तगादा लावला होता. सदर रक्कम न दिल्यास मुख्यालयी राहात नसल्याचा अहवाल शिक्षण विभागाकडे पाठविण्याची धमकीही देण्यात आली होती. त्यानंतर तडजोड होऊन २८ हजार रुपये देण्याचे ठरले होते.

दरम्यान, या प्रकरणात संबधित शिक्षकाने हिंगोलीच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधून तक्रार दिली होती. त्यानुसार आज हिंगोली येथील खटकाळी बायपास येथे लाचलुचपतचे उपाधिक्षक विकास घनवट, पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा

पोलिस निरीक्षक राजेश मलपिल्लू, सुलभा राऊत, सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक शेख युनुस, जमादार भगवान मंडलीक, रवींद्र वरणे, राजाराम फुफाटे, शिवाजी वाघ, शेख अकबर, विनोद पुंडगे, महिला पोलिस कर्मचारी योगिता अवचार यांच्या पथकाने सापळा रचला होता. दरम्यान, दुपारच्या वेळी मुख्याध्यापक कढणे याने संबंधित शिक्षकाकडून २८ हजार रुपयांची लाच घेताच लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने त्यास रंगेहात पकडले. या प्रकरणी लाचलुचपतचे निरीक्षक राजेश मलपिल्लू यांच्या तक्रारीवरून हिंगोली शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तर वाशीमच्या पोलिसांचे पथक मुख्याध्यापक कढणे याच्या मुळगावी राजगाव वाशीम येथील घराची झडती घेण्यासाठी गेल्याचे पोलिसांनी सांगितले.

## हिंगोली मतदार संघातील रेल्वे सुविधांसाठी रेल्वेमंत्र्यांकडे खा. नागेश पाटील आष्टीकर यांनी मांडल्या मागण्या

आत्ताच एक्सप्रेस



**हिंगोली –** हिंगोली मतदारसंघासह मराठवाडा व विदर्भातील प्रवाशांना अधिक चांगल्या रेल्वे सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय रेल्वेमंत्री ना. अश्विनी वैष्णव यांना भेटून विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन हिंगोली चे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे कडून देण्यात आले आहे. या निवेदनामध्ये अनेक महत्त्वाच्या रेल्वे गाड्या दररोज सुरू करणे, नवीन रेल्वे सेवा सुरू करणे तसेच काही प्रलंबित रेल्वे प्रकल्पांना गती देण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की कोल्हापूर – नागपूर एक्सप्रेस ११४०३/११४०४ ही रेल्वे सध्या आठवड्यातून केवळ दोन दिवस धावत असून ती दररोज चालविण्याची आवश्यकता आहे. ही रेल्वे कोल्हापूरसांगलीमिरजकुर्डवाडीसोलापूरलातूरपरभणीनांदेड़अकोलाअमरावती मार्गे नागपूरपर्यंत धावत असल्याने पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा व विदर्भ या तीनही भागांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. ही गाडी दररोज सुरू झाल्यास प्रवासी, व्यापारी, विद्यार्थी तसेच रुग्णांना मोठी सुविधा मिळेल.

विशेषतः पंढरपूर येथे भगवान विठ्ठलाच्या दर्शनासाठी महाराष्ट्रासह देशभरातून हजारो भाविक येत असतात. आषाढी व कार्तिकी एकादशीसह वर्षभर धार्मिक पर्यटन सुरू असते. त्यामुळे कोल्हापूरनागपूर ही रेल्वे दररोज सुरू केल्यास भाविकांना मोठी सोय होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय रेल्वे मंत्रालयाने २९ ऑगस्ट २०२३ रोजी मंजुरी दिलेली नांदेड कुर्ला (मार्गे हिंगोलीपूर्णा वाशिमअकोला) ही नवीन रेल्वे अद्याप सुरू करण्यात आलेली नाही. या रेल्वेला स्वतंत्र व कायमस्वरूपी रॅक देऊन तात्काळ नियमित सेवा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे. ही रेल्वे सुरू झाल्यास हिंगोली, वाशिम, पूर्णा, अकोला तसेच आसपासच्या ग्रामीण भागातील नागरिकांना मुंबईशी थेट रेल्वे संपर्क उपलब्ध होणार असून विद्यार्थी, नोकरी करणारे नागरिक, व्यापारी तसेच रुग्णांना मोठी सुविधा मिळणार आहे.

तसेच नांदेड़श्रीगंगानगर रेल्वे सेवा दररोज चालवावी, नांदेड़जम्मूतवी हमसफर एक्सप्रेसचा विस्तार करून ती श्री माता वैष्णोदेवी कटरा पर्यंत चालवावी आणि हिंगोली मार्गे अयोध्याधाम, हरिद्वार, जैसलमेर व फाजिल्का या ठिकाणांसाठी नवीन सुपरफास्ट रेल्वे सेवा सुरू कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली आहे.

याबरोबरच अमरावतीतिरुपती रेल्वे सेवा दररोज चालविणे, अकोलाढोन दरम्यान डबल लाईनचे काम तातडीने सुरू करणे, तसेच काही गाड्यांमधील अनावश्यक विलंब (लूज टाइम) कमी करून प्रवाशांना वेळेत सेवा देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

या सर्व मागण्या पूर्ण झाल्यास हिंगोली मतदार संघासह मराठवाडा व विदर्भातील रेल्वे प्रवाशांना मोठी सुविधा मिळेल. तसेच धार्मिक पर्यटन, व्यापार, उद्योग व क्षेत्राच्या एकूण विकासाला मोठी चालना मिळेल, असे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## मुखेड शहरातून राजरोसपणे सुरु अवैध वाळू वाहतूक; प्रशासनाने तात्काळ कारवाई करावी अन्यथा आंदोलनाचा इशारा

* आत्ताच एक्सप्रेस

**लक्ष्मीकांत मुंडे**

**नांदेड –** मुखेड शहरातून अवैधरित्या राजरोसपणे सुरू असलेली वाळूची वाहतूक तात्काळ बंद करून संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी येथील रहिवासी सचिन सखाराम इंगोले यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. अवैध वाळू वाहतुकीमुळे शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडत असून नागरिकांच्या सुरक्षेलाही धोका निर्माण झाला असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

निवेदनानुसार, मुखेड शहरातून लातूर, उदगीर, शिरूर ताजबंद, जांब बु., बाहेगाव रोड, सलगरा, खडबंडगाव–चांडोळ मार्ग आदी विविध भागांतून मोठ्या प्रमाणात टिपरच्या माध्यमातून वाळूची वाहतूक सुरू आहे. अनेक टिपर वाहनांमधून एका पावतीवर दिवसातून दोन ते तीन वेळा क्षमतेपेक्षा जास्त वाळू भरून वाहतूक केली जात असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत असून भरधाव वेगाने धावणाऱ्या या वाहनांमुळे रस्त्यांवर अपघात होण्याचा धोका वाढला आहे.

निवेदनात पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, काही वाळू माफिया शासकीय अधिकाऱ्यांशी संगनमत करून नियमबाह्य पद्धतीने वाळूचा व्यवसाय करत आहेत. नियमानुसार वाळूची वाहतूक सूर्योदयानंतर ते सूर्यास्तापर्यंत मर्यादित असणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात दिवसरात्र २४ तास ही वाहतूक सुरू असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे शहरातील नागरिक तसेच इतर वाहनधारकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

या पार्श्वभूमीवर महसूल व पोलिस विभागाने संयुक्त पथक स्थापन करून सलगरा फाटा, कमळवाडी फाटा, जांब आदी ठिकाणी कडक तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच आरटीओमार्फत संबंधित वाहनांची कागदपत्रे तपासून क्षमतेपेक्षा जास्त वाळू वाहतूक करणाऱ्या तसेच एका पावतीवर वारंवार वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर कठोर व दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन अवैध वाळू वाहतुकीवर लगाम घालावा व शासनाचा बुडणारा महसूल वसूल करावा, अन्यथा तहसील कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



# अस्थिरतेच्या खाईत प. आशिया

इराणवर हल्ला करून इस्रायल आणि अमेरिकेने पश्चिम आशियाची सत्ताव्यवस्थेचे संतुलन संपविले आहे. तिथे पुन्हा नजीकच्या काळात स्थैर्य निर्माण होणे, हे अवघड दिसते. पश्चिम आशियात शांतता कधीच नव्हती; परंतु तिथे एक प्रकारचे स्थैर्य निश्चित होते. हे स्थैर्य काही गृहीतकांवर अवलंबून होते. त्यातील सर्वांत महत्त्वाचे होते, ते इस्रायल आणि अरब देश यांच्यात विभागलेली तेथील सत्ताव्यवस्था. सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखाली अरब देशांनी इस्रायलच्या वर्चस्ववादी भूमिकेला विरोध न करणे, तसेच इस्रायलच्या आण्विक क्षमतेबाबत वाच्यताही न करणे; आणि या उलट पॅलेस्टाइनचा प्रदेश वगळता अरब राजकारणामध्ये इस्रायलने ढवळाढवळ न करणे हा या व्यवस्थेचाच एक भाग. या व्यवस्थेत इराणला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. नव्वदच्या दशकात इराकशी झालेल्या युद्धामार्फत इराणने आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न केला; परंतु त्याला फारसे यश आले नाही. इराण अण्वस्त्रांच्या दिशेने वळला आणि एकाएकी त्या देशाचे पश्चिम आशियातील महत्त्व वाढले. त्याचा खरा धोका इस्रायलला जाणवला; कारण आता तिथे आण्विक क्षमता असलेला देश त्याच्यासमोर उभे राहणार होते. आपल्या व्यतिरिक्त पश्चिम आशियात कोणीही अण्वस्त्रसज्ज होणार नाही, याची काळजी इस्रायल घेत आला आहे. म्हणूनच १९८१मध्ये इस्रायलने इराकच्या आण्विक केंद्रावर हल्ला करून त्या देशाला आण्विक कार्यक्रमापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. त्याचबरोबर गेल्या वर्षी इस्रायलने इराणच्या आण्विक केंद्रांवर हवाई हल्ला केला; परंतु त्याचा फार विपरीत परिणाम झाला, असे वाटत नाही. इराणला आण्विक कार्यक्रमापासून परावृत्त करण्यासाठी सुरुवातीला वेगवेगळे निर्बंध घालून इराणला आर्थिक दृष्ट्या अडचणीत आणण्याचे प्रयत्न झाले. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेमार्फत इराणच्या आण्विक कार्यक्रमाची चौकशी केली गेली आणि त्या कार्यक्रमावर निर्बंध घालण्यासाठी आणि देखरेखीसाठी तज्ज्ञांची नेमणूक केली गेली. नव्या इराणचा धोका अरब देशांनाही जाणवू लागल्यानंतर या प्रदेशातील सत्ताव्यवस्थेची जुनी गृहिते कोलमडली. इराणच्या विरोधात इस्रायल आणि पाश्चिमात्य देश एकत्र आली; इराणच्या आण्विक धोरणावर रोख आणण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न करू लागली. त्यातील काही प्रयत्न हे राजनैतिक होते, तर काही लष्करी स्वरूपाचे. पश्चिम आशियच्या राजकारणात स्वतःचे सत्तास्थान निर्माण करण्यासाठी इराण अनेक वर्षे प्रयत्न करीत होता. आण्विक तंत्रज्ञान विकास करणे या व्यतिरिक्त इराणने अरब देशांमधील अनेक शिया गटांना लष्करी मदत करून सक्षम बनवले होते. त्यात मुख्यतः येमेन मधील हुती आणि लेबेनानमधील हिजबुल्ला हे दोन गट महत्त्वाचे आहेत. २०२३मध्ये इस्रायलवर झालेल्या हल्ल्याला जबाबदार असलेला 'हमास' या पॅलेस्टाइन मधील गटाला याला देखील इराणकडून मदत झाली, असे मानले जाते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा सत्तेवर आल्यापासून आणि विशेषतः गेल्या वर्षी झालेल्या हल्ल्यानंतर इराणने आपली लष्करी क्षमता वाढवण्याचे व्यवस्थित प्रयत्न केले होते. अमेरिका आणि इस्रायल यांच्याकडून हल्ला होणार याची कल्पना इराणला होती. आपल्यावर हल्ला आल्यास अमेरिकेच्या पश्चिम आशियातील वेगवेगळ्या तळांवर हल्ला करू आणि त्याद्वारे हे युद्ध केवळ इराण आणि अमेरिका किंवा इराण आणि इस्रायल यांच्यापुरते मर्यादित न राहता त्याची व्याप्ती वाढवू, अशा स्वरूपाची धमकी दिली होती. ज्यो बायडेन अमेरिकेचे अध्यक्ष होते तेव्हा त्यांच्या प्रशासनाने रशिया-युक्रेन युद्ध आणि युरोपची सुरक्षा यावर लक्ष केंद्रीत केले होते. ट्रम्प प्रशासनात युरोपचे महत्व कमी होत गेले. ट्रम्प यांचे लक्ष इराणकडे वळविण्यासाठी इस्रायल अमेरिकेवर सातत्याने दबाव आणत होता. इराणला आण्विक कार्यक्रमापासून दूर करायचे असेल, तर तिथे अमेरिकाधार्जिणी राजवट असण्याची गरज होती. एकेकाळी अमेरिकेने इराणमध्ये शहा रेझा पेहेलवी यांना सत्तेवर बसवले होते. १९७९च्या इस्लामी क्रांतीपासून इराणने अमेरिकाविरोधी भूमिका घेतली होती. ही इस्लामिक राजवट हटवून शहांच्या मुलाला सत्तेवर बसविण्याच्या हेतूने ट्रम्प यांनी आपले धोरण आखले. इराणच्या राजवटीवर ताबा मिळविल्यास अरब देश साथ देतील, अशी अमेरिकेची समजूत असून, ती बऱ्याच प्रमाणात खरी आहे. हे साध्य करण्यासाठी इस्रायलच्या वापराबाबत देखील अरब देश विरोध करणार नाहीत, हेही सत्य आहे. हल्ला झाल्यास अरब देशांतील अमेरिकेच्या लष्करी तळांवर प्रतिहल्ला करण्याचे इराणने जाहीर केल्यानंतर बऱ्याच अरब देशांनी या तळांचा वापर करू नये, असा आग्रह अमेरिकेकडे धरण्याचा प्रयत्न केला. अशा आग्रहाला अमेरिका फार जुमानणार नाही, याची या अरब देशांना निश्चित खात्री असणार होती; म्हणूनच हा लढा नौदलाच्या आरमाराच्या आधारे लढू अशी जाहीर भूमिका अमेरिकेने घेतली होती. तसेच, हा हल्ला आपण सुरू करणार नाही; मात्र इस्रायलने सुरू केल्यास त्याला पाठिंबा देणे हे आपले कर्तव्य असेल, असेही स्पष्ट केले. आता इस्रायलने हल्ला केल्यानंतर अमेरिकेने त्याच बरोबरीने इराणवर हल्ला सुरू केला आहे. आजही इराणमधील इस्लामिक राज्यव्यवस्था बदलून तेथे लोकशाही सरकार स्थापन व्हावे, या हेतूने ट्रम्प हे इराणी जनतेला उद्देशून राजवट ताब्यात घेण्याचे आवाहन करीत आहेत. इराणने प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे आणि त्यात अरब देशांतील अमेरिकी लष्करी तळांना लक्ष्य केले आहे. या युद्धात रशिया किंवा चीन यांनी इराणच्या बाजूने भूमिका घेतली असली, तरी ते प्रत्यक्षात किती मदत करतील याबाबत शंका आहे. हे युद्ध आपल्या अस्तित्वाचे युद्ध आहे हे इराण जाणून आहे. म्हणूनच इस्रायल लक्ष्य असला, तरी हा लढा अमेरिकेच्या विरुद्ध आहे हे इराण जाणून आहे. अशा लढ्यामध्ये हुती किंवा हिजबुल्ला यांसारखे गट सक्रिय होणार हे उघड आहे. आपले सैन्य इराणच्या भूमीवर प्रत्यक्षात न उतरवता तंत्रज्ञानाचा वापर करून क्षेपणास्त्र किंवा इतर शस्त्र वापरून अमेरिका हा लढा करू इच्छिते; कारण अमेरिकी सैन्य मारले गेल्यास अफगाणिस्तानची पुनरावृत्ती होईल आणि अमेरिकी जनतेचा युद्धाला असलेला पाठिंबा आहे तो संपेल, अशी भीती आहे. अमेरिकी सैन्याशी प्रत्यक्षात आपण लढलो नाही, आणि अमेरिकन आरमाराची लढा करण्याची वेळ आल्यास इराणला त्याच्या मर्यादा माहिती असतील, त्यामुळे प्रत्यक्ष लढा केवळ इस्रायल विरुद्ध होऊ शकतो; परंतु अमेरिकेविरुद्धचा लढा हा एका वेगळ्या पातळीवर, अपारंपारिक पद्धतीने लढावा लागेल हेही इराण जाणून आहे. म्हणूनच इराणचा लढा प्रदीर्घ असेल, चिघळत जाणारा असेल आणि त्याकडे यश किंवा अपयश अशा पद्धतीने बघता येणार नाही.

# त्याग, सेवा आणि समर्पणाचा ३५० वा शहिदी समागम-एक अविस्मरणीय अनुभव




''बोले सो निहाल, सत श्री अकाल !'' या जयघोषाने जेव्हा नवी मुंबईचे आकाश दुमदुमले, तेव्हा तो केवळ एक आवाज नव्हता, तर ती लाखो अंतःकरणातील श्रद्धा आणि कृतज्ञतेची अभिव्यक्ती होती.

'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादुरजींच्या ३५० व्या शहिदी समागमाचे मुख्य राज्य समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडताना, या सोहळ्याचे भव्यत्व आणि त्यामागील आध्यात्मिक शक्ती जवळून अनुभवण्याचे भाग्य मला लाभले. नवी मुंबईच्या पावन भूमीवर पार पडलेला हा सोहळा म्हणजे केवळ एक कार्यक्रम नव्हता, तर ते सत्य, करुणा, धैर्य आणि सहिष्णुतेचे जिवंत दर्शन होते. या ठिकाणी राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडले.

**आध्यात्मिकतेचा आणि एकतेचा त्रिवेणी संगम..**

नागपूर, नांदेड आणि आता नवी मुंबई अशा तीन टप्प्यांतून प्रवाहित झालेला हा भक्तिसोहळा २८ फेब्रुवारी आणि १ मार्च रोजी परमोच्च शिखरावर पोहोचला. या दोन दिवसांत केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातून भाविकांचा ओघ नवी मुंबईकडे वळला होता. या समागमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे सर्वसमावेशक स्वरूप. सीख समुदायासोबतच सिकलगर, सिंधी, मोहयाल, लबाणा, बंजारा, वाल्मिकी आणि नामदेव भगत वारकरी संप्रदायातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा केवळ एका धर्माचा सोहळा नव्हता, तर तो मानवतेचा उत्सव होता.

पहाटेपासूनच ''वाहे गुरु'' च्या जपामध्ये भाविक रांगा लावून श्री गुरु ग्रंथसाहिबजींच्या दर्शनासाठी आसुसलेले दिसत होते. अखंड कीर्तन आणि रसाळ गुरुवाणीने, या समागमातील थोर संत महात्म्यांच्या उपस्थितीने हा संपूर्ण परिसर एका वेगळ्याच आध्यात्मिक विश्वात नेऊन ठेवला होता.

विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लंगरमध्ये सेवा दिली, जे पाहून उपस्थित भाविक भारावून गेले. याशिवाय 'जुता घर' ही संकल्पना देखील तितकीच आध्यात्मिक होती. भाविकांची पादत्राणे सांभाळणे, ही सेवा करून स्वतःचा अहंकार त्यागण्याची आणि नम्रतेची साधना येथे अनेक सेवाभावी संस्थांच्या सदस्यांनी केली.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी महत्त्वाच्या घोषणांनी या सोहळ्याला ऐतिहासिक परिमाण प्राप्त करून दिले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे या उपक्रमाचे कौतुक केले, तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री गुरु तेग बहादुर साहिबजींच्या बलिदानाचा इतिहास आता महाराष्ट्रातील शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाईल, अशी महत्त्वाची घोषणा केली. तसेच, नवी मुंबईत त्यांच्या नावाने एक भव्य रुग्णालय उभारण्याचा निर्णयही जाहीर केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूंच्या विचारांचा वारसा जपण्यासाठी राज्यभर 'डिजिटल रथ' फिरवण्याचा संकल्प बोलून दाखवला. तर उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनीही अल्पसंख्याक समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी शासन प्रयत्नशील असल्याचा विश्वास व्यक्त केला.

**नियोजनाचे आव्हान आणि यशस्वी पूर्तता..!**

लाखो भाविकांची उपस्थितीत असलेल्या कार्यक्रमाचे नियोजन करणे हे एक शिवधनुष्य पेलण्यासारखे होते. पण गुरुसाहेबांच्या कृपेने आणि प्रशासन, स्वयंसेवक व सेवाभावी संस्थांच्या सहकार्याने हे शक्य झाले. भाविकांसाठी उभारण्यात आलेला 'भव्य लंगर' हा श्रद्धेचा आणि नि:स्वार्थ सेवेचा कळस होता. जाती-पातीचे, उच्च-नीचतेचे सर्व अडसर दूर सारून लाखो लोकांनी या प्रसादाचा लाभ घेतला. चहा, अल्पोपहार, ज्यूस आणि विविध माहितीपर स्टॉल्सच्या माध्यमातून प्रत्येकाची काळजी घेतली जात होती.

कोकण, पुणे आणि नाशिक विभागीय आयुक्त कार्यालय, या विभागातील सर्व जिल्हे, सर्व महानगरपालिका, सिडको, पोलीस यंत्रणा, आरोग्य यंत्रणा यांच्यासह विविध शासकीय विभागांनी या सोहळ्यात घेतलेली भूमिका अत्यंत कौतुकास्पद आहे. विशेष म्हणजे कोकण विभागीय आयुक्त कार्यालय, रायगड आणि ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय, सिडको आणि पनवेल व नवी मुंबई नगरपालिका, नवी मुंबई पोलीस आयुक्तालय यांनी समर्पित भावनेने दिलेल्या सेवेचे कौतुक करावे तितके कमीच आहे. पिण्याच्या पाण्याचे नियोजन असो किंवा स्वच्छतेसाठी तैनात केलेले शेकडो कर्मचारी आणि घंटागाड्या; प्रत्येक स्तरावर शिस्त दिसून येत होती. वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी २५० ट्रॅफिक वॉर्डन्सनी अहोरात्र कष्ट घेतले, ज्यामुळे कुठेही विस्कळीतपणा जाणवला नाही.

**तंत्रज्ञान आणि इतिहासाची सांगड**

ऑडिओ-व्हिज्युअल कक्ष या समागमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे अत्याधुनिक 'ऑडिओ-व्हिज्युअल कक्ष'. श्री गुरु तेग बहादुर साहिबजींनी संस्कृती रक्षणासाठी व अन्याय दूर करण्यासाठी दिलेले सर्वोच्च बलिदान नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे आवश्यक होते. या कक्षात एकावेळी १००० भाविक बसू शकतील, अशी व्यवस्था होती. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने गुरुसाहेबांचा जीवनपट जेव्हा पडद्यावर उलगडला, तेव्हा उपस्थित्यांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या होत्या. हा इतिहास केवळ पुस्तकात न राहता तो काळजापर्यंत पोहोचवण्याचे काम या उपक्रमाने केले.

**आरोग्य सेवा: मानवतेची खरी पूजा''**

माणुसकीची सेवा हीच खरी ईश्वर सेवा हा संदेश प्रत्यक्षात उतरवताना आम्ही भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. ५० तज्ज्ञ डॉक्टर आणि १०० पॅरामेडिकल स्टाफ अहोरात्र सेवेत होते. विशेष म्हणजे, ६० हून अधिक दात्यांनी रक्तदान करून गुरुसाहेबांच्या बलिदानाच्या स्मृतींना उजाळा दिला. वृद्ध आणि दिव्यांगांसाठी व्हिलचेअर आणि ई-व्हेइकलची सोय करण्यात आली होती. वाढत्या तापमानाचा विचार करून परिसरात 'मिस्ट वेहिकल्स' च्या माध्यमातून गारवा राखण्याचा प्रयत्न केला गेला. दंत चिकित्सा, अस्थिरोग, स्त्रीरोग तज्ज्ञांपासून ते कॅन्सर स्क्रिनिंग आणि थॅलेसेमिया प्रबोधनापर्यंत सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध होत्या. ही केवळ वैद्यकीय मदत नव्हती, तर ती भाविकांप्रती असलेली कृतज्ञता होती.

**सांस्कृतिक वारसा आणि शौर्याचे प्रदर्शन**

या कार्यक्रमात केवळ धार्मिक विधिच नव्हते, तर शिख धर्माच्या शौर्याचे प्रतीक असलेले 'गतका' प्रात्यक्षिके पाहून उपस्थितांच्या अंगावर शहारे येत होते. नगर कीर्तन, पुष्पवृष्टी आणि माहितीपटांच्या माध्यमातून श्री गुरु तेग बहादुरजींच्या 'हिंद दी चादर' या पदवीची सार्थकता सर्वांना पटवून देण्यात आली. त्यांनी स्वतःचे शीश अर्पण करणे मान्य केले, पण तत्त्वांशी तडजोड केली नाही, हा संदेश आजच्या काळातही तितकाच प्रासंगिक आहे.

**एक नवी ऊर्जा आणि दिशा..!**

या समितीचा राज्य समन्वयक म्हणून काम करताना मला जाणवले की, जेव्हा हेतू शुद्ध असतो आणि सोबतीला सेवाभाव असतो, तेव्हा अशक्य गोष्टीही शक्य होतात. विविध शासकीय विभाग आणि हजारो नि:स्वार्थ स्वयंसेवकांच्या योगदानामुळेच हा ३५० वा शहिदी समागम ऐतिहासिक ठरला. श्री गुरु तेग बहादुरजींनी दिलेला त्याग आणि मानवतेचा संदेश आपल्या मनात कायम राहील. नवी मुंबई आणि राज्यातील इतर भागातून आलेल्या भाविकांनी हे सिद्ध केले की, आजही आपल्या समाजात श्रद्धा, शिस्त आणि एकता टिकून आहे. या पवित्र कार्यात खारीचा वाटा उचलता आला, याचे मला मनस्वी समाधान आहे.''वाहे गुरु जी का खालसा, वाहे गुरु जी की फतेह!''

**– रामेश्वर नाईक**
(मुख्य राज्य समन्वयक, 'हिंद दी चादर' शहिदी समागम-कार्यक्रम)

**

# फायटर संजू

१ मार्चच्या रात्री कोलकात्यासह तमाम भारतात दिवाळीच जणू साजरी झाली. ही फटाक्यांची नव्हे तर फटक्यांची दिवाळी होती आणि ज्या फटाक्याने ही फटक्यांची दिवाळी साजरी केली तो फटाका होता संजू सॅमसन. केरळमध्ये स्थानिक क्रिकेटची नांदी झालेला संजू विंडिजविरुद्धच्या सुपर एट सामन्यात अविस्मरणीय खेळी खेळून गेला. समोरून ठराविक अंतराने विकेट्स पडत असताना संजू बर्फाची लादी डोक्यावर ठेवल्यागत ध्यानस्थ वृत्तीने खेळला. त्याच एकाग्र चित्ताने त्याने संघाला विजयासाठी ६ चेंडूंमध्ये ७ धावा हव्या असताना लीलया षटकार ठोकला. पुढच्या चेंडूवर विजयी चौकार मारल्यावर स्टेडियमसह अवघ्या भारतात आनंदोत्सव झाला. तर, संजूही त्यावेळी भावनिक झाल्याचं अवघ्या क्रिकेटरसिकांनी पाहिलं. कोलकात्यामध्ये रंगलेल्या नॉक आऊट मॅचचा गड सर झाला होता आणि तो गड सर करणारा सेनापती होता संजू सॅमसन.

संजूचा केरळमधील स्थानिक क्रिकेटर ते भारतीय संघाचा यष्टीरक्षक सलामीवीर हा प्रवास बरंच काही सांगून जाणारा आहे. त्याचे वडील दिल्लीतील पोलीस कॉन्स्टेबल आणि फुटबॉलर. त्यांनी संजूमधली क्रिकेटची गुणवत्ता हेरली आणि त्या बीजाची मशागत करायचं ठरवलं. नोकरीतून निवृत्त होत ते केरळला गेले, तिथे संजूच्या करीअरला खरी दिशा मिळाली असं म्हणायला हरकत नाही. सुरुवातीची क्रिकेटमधील बाराखडी दिल्लीत गिरवल्यावर संजूच्या गुणवत्तेला जे पैलू पाडले गेले ते केरळमध्येच.

स्थानिक क्रिकेट, आयपीएल, भारतीय संघ अशा पायऱ्या तो चढत राहिला. त्याने अकरा वर्षांपूर्वी टी-ट्वेन्टी पदार्पण केलं. पुढच्या दशकात आंतरराष्ट्रीय मॅचेससाठी संघामध्ये आतबाहेर राहिला. अगदी अलिकडेच झालेल्या किवींविरुद्धच्या मालिकेत तसंच ऑसींविरुद्धच्या मालिकेतही त्याला फारसा ठसा उमटवता आला नव्हता.असं असलं तरीही स्थानिक क्रिकेटमध्ये तो धावांचा रतीब घालत राहिला. मुश्ताक अलीसह रणजी सामन्यांमध्येही त्याने केरळसाठी दमदार कामगिरी केली. त्याच वेळी आयपीएलच्या मैदानातही त्याचं नाव दुमदुमत होतं. राजस्थान रॉयल्सचं नेतृत्व करणाऱ्या संजूने त्यांना फायनलची वेस गाठून दिली होती. या प्रवासावेळी राजस्थानचा कोच होता राहुल द्रविड. एकूणातच संजूच्या करीअरमध्ये द्रविडचं मार्गदर्शन अत्यंत बहुमोल असल्याचं त्याचे वडीलही सांगतात. संजूने द्रविडच्या त्याच भन्नाट टेम्परामेंट आणि संयमांचं दर्शन रविवाच्या प्रेशर मॅचमध्ये घडवलं. दुसरीकडून सातत्याने विकेट्स जात होत्या. टार्गेट २०० च्या जवळ होतं. तरी संजू अत्यंत फोकस्ड होता. चेहऱ्यावर दृढ निर्धार दिसत होता. फटक्यांची निवड अत्यंत अचूक होती. जोखीम न पत्करताही त्याने गाठलेला स्ट्राईक रेट आणि लगावलेले फटके सारंच अचंबित करणारं होतं. त्याची आकडेवारी पाहा.... ५० चेंडूंमध्ये नाबाद ९७ धावा, स्ट्राईक रेट १९४ चा. ज्यामध्ये होते १२ चौकार, ४ षटकार. त्याच्या याच मॅच विनिंग खेळीने भारताला सेमी फायनलचं दार उघडून दिलं. टी-ट्वेन्टी वर्ल्डकपमध्ये आता निर्णायक सामने शिल्लक असतानाच्या या कामगिरीने त्याच्या करीअरला उभारी मिळेल हे निश्चित. याच संजूला याआधीच्या २०२४ च्या भारताने जिंकलेल्या टी-ट्वेन्टी वर्ल्डकपमध्ये डग आऊटमध्ये बसून सामने पाहावे लागले होते. कारण, संघात स्पर्धा तगडी होती.

रोहित-विराट सलामीला खेळायचे तर, ऋषभ पंतसारखा यष्टीरक्षक फलंदाज संघात पाय रोवून होता. यंदाच्या वर्ल्डकपमध्ये परिस्थिती वेगळी आहे. रोहित, विराटने टी-ट्वेन्टीमध्ये बॅट म्यान केलीय. यंग टीम इंडिया मैदानात उतरलीय. त्याच वेळी ईशान, अभिषेक या जोडीच्या साथीने सलामीचा तिसरा पर्याय आणि यष्टीरक्षक म्हणून संजूकडून अपेक्षा करण्यात येतायत. ज्याची पूर्तता या अत्यंत मोलाच्या सामन्यात त्याने केली. रविवारचा सामना जिंकल्यावर तो भरभरून व्यक्त झाला, तो म्हणाला, मी ५०-६० सामनेच खेळलो असेन, पण, मी १०० च्या आसपास सामने जवळून पाहिलेत. तेव्हा रोहित, विराटसारख्या महान क्रिकेटर्सचा खेळ बारकाईने अनुभवायला मिळाला.

आपल्या इनिंगदरम्यान गियर कसा आणि कधी बदलायचा याचा अभ्यास मी बारकाईने केला, ज्याचा मला फायदाच झाला. सध्या संघातली स्पर्धा तगडी आहे, त्यामुळे संजूला एक इनिंग खेळून भागणार नाहीये, धावांच्या राशी घालाव्या लागतील. ईडना गार्डन्सवर केलेल्या इनिंगसारख्या अनेक इनिंगच्या टोलेजंग इमारती त्याला उभाराव्या लागतील. ही इनिंग त्याच्या करीअरचा नवा टेकऑफ ठरावा, अशी अपेक्षा आता क्रिकेटरसिक करतायत.

# मायाचा भावनिक मुक्त प्रवास

एकदा शूटिंगच्या वेळी ज्येष्ठ अभिनेते स्व. विक्रम गोखलेजी एका दिग्दर्शकाला माझ्यासमोर म्हणाले , ''मी आघात नावाचा मराठी चित्रपट दिग्दर्शित केला आहे व त्यात एका अभिनेत्रीने सर्वोत्तम काम केले आहे. तिचे जेवढे कौतुक करावे, तेवढे कमी आहे, खरोखर ती खूपच गुणी अभिनेत्री आहे.'' ते ज्या अभिनेत्रीचे नाव घेत होते, जिचे तोंडभरून कौतुक करीत होते, त्या अभिनेत्रीचे नाव आहे मुक्ता बर्वे. तिच्या अभिनयाला मिळालेली ती जिवंत पावतीच होती.

मुक्ताचा जन्म पुण्याचा, शालेय शिक्षण झाल्यावर तिने अभिनयाची वाट धरली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून तिने अभिनयाची पदवी घेतली. 'चकवा' हा तिचा पहिला मराठी चित्रपट होता. 'जोगवा' चित्रपटातील भूमिकेसाठी तिला महाराष्ट्र राज्य शासनाचा सर्वोत्तम अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला. मुंबई पुणे मुंबई, आघात, डबल सीट, बदाम राणी गुलाम चोर, स्माईल प्लीज हे चित्रपट तिने केले. आतापर्यंत तिला महाराष्ट्र राज्य शासनाचे सात पुरस्कार मिळाले आहेत. घडलंय बिघडलंय, आभाळमाया, एका लग्नाची दुसरी गोष्ट या मालिकांतून तिने प्रेक्षकांना अभिनयाची विविधता दाखविली आहे. फायनल ड्राफ्ट, देहभान, छापा काटा या नाटकातून तिने अभिनयाची झलक दाखविली होती.

नात्यांच्या गुंत्यातील भावविश्व अधिक गहिरे करणारा 'माया' चित्रपट नुकताच रिलीज झाला आहे. शालिनी सिनेमाज आणि नितीन वैद्य प्रोडक्शन निर्मित या चित्रपटाचे निर्माते डॉ. सुनील दातार, अलका मधुकर दातार आणि नितीन प्रकाश वैद्य आहेत. माणूस खरोखरच एकटेपणाला घाबरतो की पोरकेपणाच्या भावनेला? नात्यांमध्ये गैरसमजुती, मनात साचत जाणाऱ्या अढी आणि त्या अढीमुळे दुरावत जाणारी माणसं यांचा भावनिक प्रवास प्रभावीपणे या चित्रपटात मांडण्यात आलेला आहे. आयुष्य पुढे सरकण्यासाठी आवश्यक असलेली भावनिक मुक्तता आणि समजूतदार संवाद या चित्रपटांमध्ये प्रेक्षकांना पाहायला मिळेल.

या चित्रपटामध्ये अनेक बेटावर जगणाऱ्या माणसांची गोष्ट आहे. त्यातले एक पात्र मुक्ताने साकारले आहे. ही माणसे जेव्हा एकत्र येतात, तेव्हा त्यांच्या नात्यात काय घडू शकतं, असे थोडक्यात या चित्रपटाचे कथानक आहे. या चित्रपटामध्ये माया नावाची व्यक्तिरेखा तिने साकारली आहे. ती फिजिओथेरपिस्ट असते.

रोहिणी हट्टंगडी, डॉ. गिरीश ओक, सिद्धार्थ चांदेकर या कलावंतासोबत तिची या चित्रपटामध्ये अभिनयाची भट्टी चांगलीच जमली आहे. जेव्हा या चित्रपटाचे शूटिंग सुरू होते, त्यावेळी तिचे रोहिणी हट्टंगडी सोबतचे 'चारचौघी' हे नाटक सुरू होते. ललित कला केंद्र मधून जेव्हा ती नाटक करायची, त्यावेळी विजय केंकरे तिचे गुरू होते. सिद्धार्थ चांदेकरसोबत अगोदर तिने 'अग्निहोत्र' ही मालिका व 'लग्न पाहावे करून' या चित्रपटामध्ये काम केले आहे.

डॉ. गिरीश ओकसोबत तिने 'देहभान' या नाटकात काम केले होते. दिग्दर्शक आदित्य इंगळेसोबत तिने 'अलिबाबा आणि चाळिशीतील चोर' या चित्रपटात अगोदर काम केले होते. 'माया' चित्रपटामध्ये तिने परत एकदा दिग्दर्शक आदित्य इंगळेसोबत काम केले आहे. या चित्रपटामध्ये त्यांच्यासोबत काम करताना कसे वाटले असे विचारले असता ती म्हणाली की, आदित्य इंगळे यांचं वैशिष्ट्य म्हणजे माणसातील भावभावनांचा पदर तो चांगल्या रीतीने उलगडून चित्रपटामध्ये प्रेक्षकांसमोर मांडतो. एखाद्या परिस्थितीमध्ये दोन वेगळ्या व्यक्ती भेटल्या, तर त्यांच्या मनामध्ये कोणत्या भावना येतात, हे तो अचूक हेरून ठेवतो. तो एक चांगला लेखक आहे व त्याचे भाषेवरचे प्रभुत्व उत्तम आहे. त्यामुळे या चित्रपटाचे संवाद डॉ. कुलकर्णी आणि त्याने छान लिहिले आहेत. त्याला चित्रपटामध्ये काय करायचे या बाबत तो ठाम होता. तरीदेखील कलाकारांना चित्रपटात काही चांगलं करण्यासाठी तो जागा ठेवून देतो. त्याला पटलं तर तो चित्रपटामध्ये ठेवतो, नाही पटलं तर कलाकारांना करू नका असे सांगतो. या चित्रपटाचे शूटिंग लंडनमध्ये झाले, एक छोटासा भाग पुण्यामध्ये चित्रित करण्यात आला. या चित्रपटामध्ये दोन गाणी आहेत. ती छान झाली आहेत. या चित्रपटाचे संगीत पार्थ उमरानीने दिले आहे. वैभव जोशीच्या शब्दांना पार्थ व अंजली मराठेने स्वरसाज चढविला आहे.

आयुष्यात काही नाती आपण जपतो, काही नाती नकळतपणे तुटून जातात. पण प्रत्येक नात आपल्याला काहीतरी संचित देऊन जातो. भूतकाळाच्या सावल्या कितीही गडद असल्या तरीही एकमेकांमधील संवाद आणि कुणाचा तरी मायेने झालेला स्पर्श यांच्या जोरावर आयुष्याच्या नवीन प्रवासाची सुरुवात करता येणे शक्य असते.

**– युवराज अवसरमल**

***

# सहकाररत्न स्व.ओमप्रकाशजी देवडा यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त भावपुर्ण संगीतमय श्रध्दांजली

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** दि. ०४/०३/२०२६ रोजी ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँक लि., हिंगोली बँकेचे मुख्य कार्यालय नवीन इमारत ''ओमभवन'' येथे स्व. ओमप्रकाशजी देवडा यांच्या ११ व्या पुण्यतिथी निमित्त हार्मोनी ग्रुप छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने संगीतमय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानिमित्त गांधी सेवा ट्रस्ट हिंगोली संचलित ओमप्रकाश देवडा स्किल डेव्हलपमेन्ट सेंटर हिंगोली व प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन मुंबई यांचे संयुक्त विद्यमाने कौशल्य विकास केंद्राचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यामध्ये गरजुना ऑटोमोटिव्ह टु व्हीलर टेक्निशयन कोर्स (इलेक्ट्रिकल वाहन) व टॅली ऑपरेटर कोर्स चालविण्यात येतील.

यावेळी स्व. ओमप्रकाशजी देवडा यांना संगीतमय श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. हार्मोनी ग्रुप छ. संभाजीनगरचे गायक अंकुश लालसुरे, अनिरुद्ध वरणगावकर, अवंती जैन, कुशलकुमार जैन, यांनी सुमूधर गायनांनी उपस्थितीत शौत्यांना मंत्रमुक्त केले. अमर वानखेडे, अजय तायडे, गिरिश काळे, विनोद वाव्हळ व अंकुश बोर्ड यांनी त्यांना साथ संगत केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. अश्विनी आसेगांवकर यांनी केले.

यानिमित्त बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनिल देवडा, हिंगोलीचे वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. चंक्रधर मुंगंल, माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, नागनाथ बँकेचे अध्यक्ष ॲड.सतिश देशमुख, प्रथम फाऊंडशनचे सचिन चांदोरकर, स्वप्नील राठोड, अश्पाक सय्यद, डॉ. सचिन बगडीया, बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, एम. एम. बुद्रुक, शशिकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, गजाननराव देशमुख, आशिष काबरा, संजय देवडा, राजेश अग्रवाल, बी.ओ.एम.चे सदस्य नवनीत राठोर, कमलकिशोर बगडिया, बालाजी सोनुने, बँकेचे व्यवस्थापकीय संचालक सुधीर जालनापूरे, सरव्यवस्थापक समता अग्रवाल, उपसरव्यवस्थापक सुधीर मुळे,

सुजित कुलकर्णी, सहाय्यक सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, संजय घोडेकर, श्रीराम माळोदे, गांधी सेवा ट्रस्टचे व्यवस्थापक नंदकिशोर भालेराव, मातोश्री गंगादेवी देवडा अंध मुलांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक आशिष पिंगळकर, शंकरराव चव्हाण उर्दु स्कुल व हायस्कूलचे मुख्याध्यापक व शिक्षक वर्ग ओमप्रकाश देवडा पीपल्स को-ऑप. बँकेचे सर्वकर्मचारी वृंद उपस्थितीत होते.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी उपसरव्यवस्थापक सुधीर मुळे, नंदकिशोर भालेराव, आशिष पिंगळकर, संजय बोहरा, सहाय्यक सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, संजय घोडेकर, श्रीराम माळोदे, अनंता गटुल, मारोती देशमुख, शुभम सोनटक्के, पंकज मुदिराज सर्व कर्मचारी यांनी उत्तम नियोजन केले व अथक परिश्रम घेतले.








# पवार पब्लिक स्कूल मध्ये विज्ञान दिन साजरा

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** हिंगोली येथील पवार पब्लिक स्कूल येथे राष्ट्रीय विज्ञान दिवस हा चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला गेला.विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी पवार पब्लिक स्कूल हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे प्रोजेक्ट, मॉडेल आणि विविध विज्ञान प्रदर्शन सादर करून हा दिवस साजरा करण्यात आला.

याप्रसंगी पवार पब्लिक स्कूलचे सर्वेसर्वा प्रणव शिवाजीराव पवार यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवले. याप्रसंगी कोमल अग्रवाल, फिजा सय्यद, के सी सोली, सचिन धामणे, अपर्णा मुळे, दिपाली राऊत, अश्विनी सराफ, दिपाली मुदिराज, छाया धनवे, रुपाली ठाकरे, गजानन वानरे, योगेश थोरात, पंकज इंगोले, जोबिन जॉर्ज, सचिन इंगोले, कपिल मस्के, संतोष पाईकराव, विकास महानुर, वैभव काळे आदींची उपस्थिती होती.

# डॉ. प्रकाश अंभोरे यांना राष्ट्रीय पातळीवरील 'आदर्श मुख्याध्यापक सन्मान' पुरस्कार प्रदान

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली** –येथील भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश सुशीला सखाराम अंभोरे यांना भारत सरकार नोंदणीकृत माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाऊंडेशन यांच्या वतीने दिला जाणारा राष्ट्रीय पातळीवरील प्रतिष्ठित 'आदर्श मुख्याध्यापक सन्मान पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

हा भव्य सत्कार सोहळा १ मार्च २०२६ रोजी नाशिक येथील न्यू शेवंता बँक्वेट हॉल येथे उत्साहात पार पडला. सहाय्यक आयुक्त मनीष सानप, न्यायाधीश शिल्पा डोलारकर, शिक्षणाधिकारी डॉ. नेहा शिरोळे, राष्ट्रीय ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष दादाभाऊ केदारे तसेच राष्ट्रीय सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांच्या हस्ते डॉ. अंभोरे यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना अध्यक्ष दादाभाऊ केदारे म्हणाले की, ''डॉ. प्रकाश अंभोरे हे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात निस्वार्थ भावनेने कार्यरत असून त्यांच्या समर्पित सेवेमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत आहे. त्यांच्या उल्लेखनीय कार्यामुळे अनेकांना प्रेरणा व नवी दिशा मिळाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.''

राष्ट्रीय सचिव डॉ. अविनाश झोटिंग यांनीही आपल्या मनोगतात नमूद केले की, ''मुख्याध्यापक डॉ. अंभोरे यांचे शैक्षणिक नेतृत्व, संघटनात्मक कौशल्य आणि सामाजिक बांधिलकी आदर्शवत आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी हा सन्मान योग्यच आहे.''

डॉ. अंभोरे यांना यापूर्वीही विविध मानाचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यामध्ये ग्लोबल एक्सलन्स आयकॉन अवॉर्ड, राष्ट्रीय शिक्षकरत्न नागरी पुरस्कार, संत गाडगे बाबा राष्ट्रीय समाजरत्न पुरस्कार, मराठवाडा रत्न पुरस्कार, मराठवाडा भूषण पुरस्कार तसेच स्व. अण्णाराव टाकळगव्हाणकर स्मृती पुरस्कार यांचा समावेश आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक, संचालक केशवराव शिरसाट, पंडितराव बांगर व सर्व सन्माननीय संचालक मंडळाने त्यांचे अभिनंदन केले. तसेच उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव विठ्ठल सोळंके, प्राचार्य बाबासाहेब इंगोले, प्राचार्य विठ्ठल मुटकुळे, प्राचार्य प्रकाश नवघरे, मुख्याध्यापक नितीन अवचार, ओम तांबिले, प्रदीप बुद्रुक, माधवी आसेगावकर, नितीन बोंद्रे, बंडू सीतळे, माधव जाधव, नामदेव सरकटे आदींनी शुभेच्छा व्यक्त करून पुढील कार्यासाठी यश चिंतिले.

डॉ. प्रकाश अंभोरे यांच्या या सन्मानामुळे हिंगोली जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राची कीर्ती अधिक उंचावली असून त्यांच्या कार्यातून समाजाभिमुख शिक्षणाची नवी दिशा अधोरेखित झाली आहे.




# शिवसेना आमदार संतोष बांगर यांनी सामाजिक बांधीलकी जपत हनुमान पवार व कु.प्रीती हराळ या दिव्यांगाना केली आर्थिक मदत

* आत्ताच एक्सप्रेस
गोपालराव सरनायक

**हिंगोली–** हिंगोली तालुक्यातील सामाजिक बांधिलकी जपत आमदार संतोष बांगर यांनी गरजू नागरिकाला मोलाची मदत केली आहे. हनुमान बळीराम पवार या एक पाय तुटलेल्या व्यक्तीस त्यांनी मासिक मानधन सुरू करून आर्थिक आधार दिला आहे.

हनुमान पवार हे शारीरिक अडचणीमुळे नियमित काम करू शकत नसल्याने त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवले होते. ही बाब लक्षात घेत आमदार बांगर यांनी तात्काळ पुढाकार घेत मासिक आर्थिक मदत सुरू करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी बोलताना संतोष बांगर यांनी हनुमान पवार यांच्या मुलीच्या लग्नावेळीही आवश्यक ती मदत करण्याचा शब्द दिला. त्यांच्या या आश्वासनामुळे पवार कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

स्थानिक नागरिकांनी आमदार बांगर यांच्या या सामाजिक उपक्रमाचे स्वागत करत त्यांचे आभार मानले. गरजू आणि दिव्यांग बांधवांच्या पाठीशी उभे राहण्याची त्यांची भूमिका पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

सामाजिक बांधिलकी जपत संतोष बांगर यांनी आणखी एक मदतीचा हात पुढे केला आहे. प्रीती दत्ता हराळ या दिव्यांग मुलीचे मासिक मानधन सुरू करून त्यांनी आर्थिक सहाय्य केले आहे.

प्रीती हराळ हिच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची असून तिच्या उपचार व दैनंदिन गरजांसाठी नियमित मदतीची आवश्यकता होती. ही बाब लक्षात घेऊन आ. संतोष बांगर यांनी तात्काळ पुढाकार घेत मासिक मानधन सुरू करण्याचा निर्णय घेतला.

या मदतीमुळे प्रीतीच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून स्थानिक नागरिकांकडून या उपक्रमाचे स्वागत करण्यात येत आहे. समाजातील गरजू व दिव्यांग व्यक्तींना आधार देण्याचे कार्य पुढेही सुरू राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.





# अबब चक्क सेनगाव तालुक्यातील मौजे गुगुळ पिंपरी ग्रामपंचायत कार्यालयाने जलजीवन मिशनच्या निकृष्ट कामाच्या चौकशीची केली मागणी

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील गुगुळ पिंपरी ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमानाने जलजीवन मिशन योजनेअंतर्गत १ कोटी ४९ लाख रुपये निधी चे टेंडर निघून तनुजा कंट्रक्शन प्रोप्रायटर बालाजी भगवान घुगे यांना संबंधित जिल्हा जीवन मिशनच्या कामाचे टेंडर दिलेले आहे.

शासनाने दिलेला १८ महिन्याचा कालावधी मागील एका वर्षांपूर्वीच संपून सहा महिन्याची मुदत वाढ देऊन सुद्धा काम पूर्णतः गेले नाही. त्यामुळे आम आदमी पार्टीची जिल्हाप्रमुख बालाजीभाऊ देशमुख यांनी ग्रामपंचायत कार्यालय गुगळ पिंपरी यांना लेखी निवेदन देऊन संबंधित कॉन्ट्रॅक्टदाराकडून काम पूर्ण करून घेण्याची मागणी केली होती. परंतु संबंधित कॉन्ट्रॅक्टदार यांनी ग्रामपंचायतीने वेळोवेळी पाठपुरावा करून सुद्धा अद्याप काम पूर्णत्वास केलेले नाही. तसेच कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे ग्रामपंचायतच्या सुद्धा निदर्शनास आलेले आहे.

त्यामुळे हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यामध्ये असलेल्या मौजे गुगुळ पिंपरी या गावातील ग्रामपंचायतीने मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांना मौजे गुगळ पिंपरी येथील जलजीवन मिशन अंतर्गत झालेल्या संपूर्ण कामाची निपक्षपाती सखोल चौकशी करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे केली आहे. त्यामुळे जिल्हाभरामध्ये एकच चर्चा होत आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी मिळून गावामध्ये ३० टक्के जनता ही अद्याप पर्यंत नळ जोडणी पासून वंचित आहे.तसेच शासनाने गाईडलाईन प्रमाणे दिलेल्या कामाचे ७० टक्के काम अद्याप अर्धवट अवस्थेत मध्ये आहे. त्यामुळे आम आदमी पार्टीचे जिल्हाप्रमुख बालाजी भाऊ देशमुख यांनी प्रशासनावर संताप व्यक्त केला आहे. काल माननीय जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांची भेट घेऊन सखोल चौकशीची सुद्धा मागणी करण्यात आली आहे. सर्व गावकऱ्यांचे पुढील कारवाईकडे लक्ष लागले आहे.



# दत्तक कन्येचा महिला दिनी विवाह बालाजी विद्यालयाकडून माजी विद्यार्थ्याच्या पाठीवर कौतुकाची थाप



**हिंगोली–** वंशाला दिवा हवा म्हणून अनेक जण मुलगा दत्तक घेतात. स्त्री जन्माचे स्वागत करा अशी जनजागृतीही मोठ्या प्रमाणात होते. क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे या म्हणीप्रमाणे अनेक जण स्त्री जन्माचे केवळ शाब्दिक स्वागत करतात. परंतु मौजे वाई येथील नंदकुमार मुकाडे यांनी आपल्या भावाची लक्ष्मी नावाची मुलगी दत्तक घेतली बारावीपर्यंत तिचे शिक्षण करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथे नर्सिंग ऑफिसर या पदावर कार्यरत असलेला वर शोधून येत्या आठ मार्चला महिला दिनी लक्ष्मीचा विवाह सुनिश्चित केला. नंदकुमार मुकाडे यांच्या देखील महत्त्वाचा वाटा आहे. शाळेतून प्रथम येणाऱ्या मुलींना बक्षीस असो किंवा क्रीडा स्पर्धा मध्ये मुलींचा सहभाग वाढला पाहिजे यासाठी जे प्रयत्न असो यात नंदकुमार मुकाडे नेहमी पुढाकार घेतात.

नंदकुमार यांच्या कार्याचे कौतुक करत श्री बालाजी विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके, सहशिक्षक रामकिशन मोरे, मोहन धवसे, दिलीप सावते, गंगाप्रसाद भिसे, शिक्षकेतर कर्मचारी जगन सरकटे, गुलाब पवार, गंगाधर पोटे, प्रकाश गरड, विकास देशमुख यांनी नुकतीच भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले.



**राज्यसभा निवडणुकीकरिता रामराव वडकुते यांनी महाराष्ट्र विधानभवन येथे निवडणुक अधिकाऱ्यांकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.याप्रसंगी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, हिंगोली विधानसभेचे आमदार तान्हाजीराव मुटकुळे पाटील, माजी आमदार प्रज्ञाताई सातव आदी मान्यवर उपस्थित होते.**

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
परभणी-हिंगोली व नांदेड जिल्हयासाठी
पत्रकार पाहिजेत
महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.
नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी
परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा
हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट
संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# किनवट शहरात 'घनवन' योजनेचा शानदार शुभारंभ; युवानेते करण एंड्रलवार यांच्या हस्ते उपक्रमाची सुरुवात

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट –** वाढते प्रदूषण आणि निसर्गाचा समतोल राखण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'घनवन' ( ) या महत्त्वाकांक्षी योजनेचा किनवट शहरात शानदार शुभारंभ करण्यात आला. युवानेते करण एंड्रलवार यांच्या शुभहस्ते नगरपरिषद क्षेत्रातील डम्पिंग ग्राउंड येथे नारळ फोडून या उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. अत्यंत कमी जागेत दाट जंगल निर्माण करण्याच्या या आधुनिक तंत्रज्ञानामुळे किनवट शहराला भविष्यात हक्काचा 'ऑक्सिजन झोन' मिळणार असल्याचे मत करण एंड्रलवार यांनी यावेळी व्यक्त केले.



महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक वनीकरण विभागामार्फत 'घनवन' योजना शहरी भागात युद्धपातळीवर राबविण्यात येत आहे. नैसर्गिक जंगलाच्या तुलनेत १० पटीने वेगाने वाढणारी वने तयार करण्याच्या उद्देशाने एकाच ठिकाणी विविध प्रजातींची झाडे लावण्याचा या योजनेचा उद्देश आहे. सामाजिक वनीकरण नांदेडचे विभागीय वनाधिकारी संदीप चव्हाण, सहायक वनसंरक्षक श्रीकांत जाधव आणि वनपरिक्षेत्र अधिकारी दिनकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली किनवट येथील सामाजिक वनीकरण कार्यालयाने ४ मार्च रोजी हा उपक्रम राबविला.

यावेळी बोलताना युवानेते करण एंड्रलवार म्हणाले की, वाढत्या शहरीकरणामुळे शहरांमध्ये झाडांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. 'घनवन' योजनेमुळे कमी वेळेत अधिक हरित क्षेत्र निर्माण होईल. यामुळे परिसरातील तापमानात घट होण्यास मदत होईल तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मोठी मदत होईल.

कार्यक्रमादरम्यान सामाजिक वनीकरण कार्यालयाचे कर्मचारी टी. ए. देवकते यांनी 'घनवन' योजनेविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, शहरी भागासाठी ही राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी योजना असून दाट झाडांमुळे धुळीकण आणि ध्वनीप्रदूषणावर नियंत्रण ठेवता येते. तसेच शहरांमधून नामशेष होत असलेल्या पक्षी आणि फुलपाखरांना या वनांमुळे नवीन आश्रयस्थान उपलब्ध होईल. घनवनामुळे जमिनीत पाणी मुरण्याचे प्रमाणही वाढते.

या कार्यक्रमास उपनगराध्यक्ष हसन लाला, बांधकाम सभापती राम नेमानीवार, प्रभू कोल्हे, अनवर मिर्झा, साहिल सर, नगरपरिषदेचे कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, स्वच्छता कर्मचारी रियाज, शेबाज लाला, शिवसेनेचे शहरप्रमुख प्रशांत कोरडे, सामाजिक वनीकरण कार्यालयाचे कर्मचारी बी. एस. भुरके, एच. डी. खामकर, शेख रसूल गुलाम, अंकुश राठोड, वेद राठोड यांच्यासह स्थानिक नागरिक व वनप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे किनवट शहरात पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल उचलले गेल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# छत्रपती शिवाजी महाराज स्व अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, तहसीलदार मंजुषा भगत यांचे आव्हान

* आत्ताच एक्सप्रेस
सुमन पोलशेटवार

**उमरी –** उमरी तालुक्यातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरणारी छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर अभियानाची विशेष मोहीम मार्चपासून सुरू होत असल्याची माहिती तहसीलदार मंजुषा भगत यांनी दिली आहे.



राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत मार्च ते मी २०२६ या कालावधीत तालुक्यातील विविध महसूल मंडळामध्ये विशेष शिबिर आयोजन करण्यात आले आहे असे तहसीलदार मंजुषा भगत यांनी सांगितले

सिंगल डे सर्विस डिलिव्हरी संकल्पनेनुसार नागरिकांना एकाच दिवशी विविध शासकीय सेवा उपलब्ध करून दिल्या जाणार आहोत तहसीलदार यांनी मोहिमेची माहिती जाहीर करत ग्रामीण भागातील प्रलंबित महसूल कामे जलद गतीने मार्गी लावण्याचा निर्धार व्यक्त केला आहे

या शिबिरामध्ये सातबारा उताऱ्याचे वाचन सामाजिक अर्थसहाय्य योजनाची अर्ज स्वीकारणे तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक दाखल्याची अर्ज स्वीकारले जाणार आहेत त्याचबरोबर मंजूर फेरफार प्रकरणातील सातबारा व खाते उताऱ्याचे वाटप व आठ चा उतारा वितरण लोकसेवा हक्क दाखले उत्पन्न रहिवासी प्रमाणपत्र नॉन क्रिमिलियर सिंगल विंडो प्रणाली एकाच ठिकाणी अर्ज स्वीकारणे पडताळणी आणि तात्काळ सेवा यासह विविध सेवा उपलब्ध देण्यासाठी तहसीलदार नायब तहसीलदार सर्वेक्षण समन्वय आणि शिबीर प्रभारी मंडळ अधिकारी तलाठी स्थानिक नियोजन अर्ज स्वीकारणारे सहनियंत्रण व अहवाल डॅश बोर्ड पर पत्र एक ते सहा अधिकृत अहवाल नमुना फेरफार निकाली काढणे सातबारा दुरुस्ती डिजिटल सातबारा वितरण आणि प्रमाणपत्र वितरणाचा दैनंदिन अहवाल सादर होणार आहे नागरिकांनी आपल्या तक्रारी आवश्यक मूळ कागदपत्र छायांकित प्रतीसह वर दिलेल्या तारखेला संपन्न होणाऱ्या शिवारात उपस्थित राहून आपल्या तक्रारीचे निवारण करून घ्यावे अशी आव्हान तहसीलदार मंजुषा भगत यांनी केले आहे

उमरी तालुक्यात महाराज स्व अभियान अंतर्गत शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे दरम्यान ७ मार्च सिंधी दहा मार्च गोळेगाव १४ मार्च १० एप्रिल धानोरा बुद्रुक आठ मे उमरी या ठिकाणी राहणार आहे या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा अशी आव्हान तहसीलदार मंजुषा भगत यांनी केली आहे

# उन्हाची तीव्रता वाढल्याने नांदेड जिल्ह्यातील शाळा सकाळच्या सत्रात

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे




**नांदेड –** जिल्ह्यात वाढत चाललेल्या उन्हाच्या तीव्रतेचा विचार करून विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने नांदेड जिल्ह्यातील शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. जिल्हा परिषद नांदेडच्या शिक्षण विभागाकडून याबाबत आदेश जारी करण्यात आले आहेत.

शिक्षणाधिकारी (प्रा.) जिल्हा परिषद नांदेड यांच्या आदेशानुसार जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आता सकाळी ८:३० ते दुपारी १:०० या वेळेत भरविण्यात येणार आहेत. वाढत्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांना त्रास होऊ नये तसेच त्यांच्या आरोग्याचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

या आदेशानुसार शाळांनी सकाळच्या सत्रानुसार वेळापत्रक निश्चित करून अध्यापनाचे तास पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच सर्व मुख्याध्यापकांनी आपल्या शाळेचे अंतिम वेळापत्रक ठरवून संबंधित गटशिक्षणाधिकाऱ्यांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

दरम्यान, जिल्ह्यातील सर्व शाळांनी शासनाच्या निर्देशांचे पालन करून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची व आरोग्याची विशेष काळजी घ्यावी, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" प्रभावी राबविण्याबाबत मार्गदर्शन

## विभागीय आयुक्तांनी अधिकाऱ्यांशी दूरदृश्य प्रणालीद्वारे साधला संवाद

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी व महिलांच्या महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" या उपक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे.


या अनुषंगाने आज ५ मार्च २०२६ रोजी नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी (बीडीओ) तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधण्यात आला.

या संवादादरम्यान विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

महसूल विभागाशी संबंधित सेवा तळागाळातील नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अकृषिक रुपांतरणासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक नसणे, सनद प्रणाली, संपुष्टात आणण्याची प्रक्रिया, एकवेळचे अधिमूल्य भरण्याची नवी तरतूद, तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा तसेच अभिलेख अद्ययावत करण्यासंदर्भातील विविध सुधारणा यांची माहिती ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी व्यापक जनजागृती व प्रसार अभियान राबविण्याचे निर्देश दिले.

याशिवाय महसूल विभागाबरोबरच इतर शासकीय विभागांच्या सेवांबाबत नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी योग्य नियोजन करण्यास सांगण्यात आले. नागरिकांच्या दीर्घकालीन प्रलंबित तक्रारी तसेच दैनंदिन सेवा एकाच खिडकीतून मंडळस्तरावर आयोजित करण्यात येणाऱ्या समाधान शिबिरांद्वारे उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

तसेच या अभियानाची माहिती प्रत्येक गावातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी व्यापक प्रचार व प्रसिद्धी करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ग्रामसभा, दवंडी, सूचना फलक, सोशल मीडिया तसेच इतर माध्यमांचा वापर करून नागरिकांना शिबिरांची माहिती देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.



गावपातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या महाराजस्व समाधान शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन महसूल विषयक अडचणी व प्रलंबित बाबी मांडाव्यात, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

नांदेड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गट विकास अधिकारी तसेच ग्रामपंचायतींचे सरपंच व संबंधित यंत्रणांनी या अभियानाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी सक्रिय सहभाग नोंदवून नागरिकांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी समन्वयाने कार्य करावे, असेही निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

# किनवट येथे बँक सुरक्षा संदर्भात पोलीसांची बैठक; बँक व्यवस्थापकांना सतर्कतेच्या सूचना

* आत्ताच एक्सप्रेस
लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट –** किनवट पोलीस स्टेशन येथे आज उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघने यांच्या नेतृत्वाखाली किनवट शहर व ग्रामीण भागातील सर्व बँक व्यवस्थापक आणि त्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. ही बैठक दुपारी १:३० ते २:१५ या वेळेत पार पडली.



या बैठकीत बँक सुरक्षेबाबत घ्यावयाच्या विविध खबरदारींचा आढावा घेण्यात आला. बँकेच्या आतील परिसर, पोर्च तसेच बँकेसमोरील रस्ता या सर्व भागांवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे कव्हरेज असणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. तसेच बँकांशी संलग्न असलेल्या एटीएम केंद्रांवरील कॅमेरे कार्यरत स्थितीत आहेत का, याबाबतही पोलीस प्रशासनाने विचारणा केली. यावर सर्व बँक प्रतिनिधींनी कॅमेरे सुरळीत सुरू असल्याची माहिती दिली.

बैठकीदरम्यान प्रत्येक बँकेत सुरक्षा रक्षक नेमणे, त्यांना सतर्कतेबाबत आवश्यक सूचना देणे, तसेच एटीएम व बँक परिसरात संशयास्पद हालचाली आढळल्यास तात्काळ पोलीसांना कळविण्याचे निर्देश देण्यात आले. बँक व एटीएम परिसर सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या नेतृत्वात पार पडलेल्या या बैठकीमुळे बँक सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेऊन पुढील काळात अधिक सतर्कता बाळगण्याबाबत सर्व बँक प्रतिनिधींना मार्गदर्शन करण्यात आले.

# समाजकल्याण योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती; जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दाखवली चित्ररथाला हिरवी झेंडी

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड –** समाजकल्याण विभागाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी एलईडी चित्ररथाद्वारे जिल्ह्यात जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या चित्ररथाला आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून रवाना करण्यात आले.




जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात आयोजित या कार्यक्रमास प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी प्रमोद धोंगडे, उपसंपादक अलका पाटील, लेखा लिपीक अनिल चव्हाण उपस्थित होते. हा चित्ररथ जिल्ह्यातील विविध गावांमध्ये जाऊन समाज कल्याण विभागाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणार असून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी जनजागृती करण्यात येणार आहे.


# माझं गाव, आरोग्यसपन्न गाव" योजनेस मंत्रीमंडळाची मान्यतालोकसहभागातून आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार, दि. १ एप्रिलपासून वर्षभर राबविणार अभियान

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली –** राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त व स्वयंपूर्ण करण्याच्या दिशेने आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या महत्वाकांक्षी "माझं गाव, आरोग्य संपन्न गाव" या अभियानास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. हिंगोली जिल्ह्यात लोकसहभागावर आधारित "माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" ही राज्यव्यापी आरोग्य चळवळ राबविण्यास १ एप्रिल पासून ३१ मार्चपर्यंत हे अभियान राबविण्यात येणार आहे.

त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हा परिषद येथील व्हिडिओ कॉन्फरन्स सभागृहात सर्व गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी यांची बैठक घेऊन अभियानाची दिशा ठरविण्यात आली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) समृद्धी दिवाणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गडापोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, गट विकास अधिकारी माया वानखडे, अनिल मुंढे, प्रफुल्ल तोटेवाड, सुरेश कांबळे, कार्यकारी अभियंता श्री. नरवाडे यांच्यासह सर्व विस्तार अधिकारी व तसेच जिल्ह्यातील ग्रामसेवक हे ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते.




गाव पातळीवर नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी, प्रतिबंधात्मक व प्रोत्साहनात्मक आरोग्य सेवांना चालना देण्यासाठी, आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत बदल, व आरोग्यदायी जीवनशैली रुजवण्यासाठी हे अभियान प्रभावी ठरणार असून, सार्वजनिक स्वच्छता, पाणीपुरवठा, सामाजिक प्रबोधन यासह ग्रामीण भागातील विविध घटकांच्या समन्वयाने आरोग्यदायी गाव बनवणे हा या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गायकवाड यांनी सांगितले

या अभियानांतर्गत उपचारांपेक्षा आजार होऊ नयेत, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजारांचे प्रमाण कमी करणे, माता-बाल आरोग्य सुधारणे, पोषण, स्वच्छता, सुरक्षित पाणी, सांडपाणी व्यवस्थापन, जीवनशैलीजन्य आजारांचे नियंत्रण आणि मानसिक आरोग्य यांचा समावेश या मोहिमेत करण्यात आला आहे. नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे.

"माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव" योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामपंचायत स्तरावर समित्या स्थापना केल्या जाणार आहेत. आरोग्यमंत्री श्री. आबीटकर यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती असून, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, आयुक्त व संचालक या समितीचे सदस्य असतील. राज्यस्तरीय कृती समितीही स्थापन करण्यात येणार असून, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव (अपर मुख्य सचिव) समितीचे अध्यक्ष असतील. आरोग्य विभागाच्या निर्देशानुसार गावांचे मूल्यमापन करण्यात येणार आहे. एकूण गुणांपैकी ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या गावांना "आरोग्यसंपन्न गाव" म्हणून घोषित करण्यात येईल. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव ही योजना म्हणजे केवळ आरोग्य विभागाची नव्हे, तर समाजाच्या सर्व घटकांच्या सहभागातून उभी राहणारी लोकचळवळ ठरणार आहे. या निर्णयामुळे ग्रामीण आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा मिळणार असून, आरोग्यदायी महाराष्ट्र घडविण्याच्या संकल्पनेला बळकटी मिळणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813